**<u>ठळक बातम्या</u>**

- संविधान सभेत झालेल्या चर्चा, हा गौरवशाली वारसा असून संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहिलं पाहिजे, असं प्रधानमंत्र्यांचं 'मन की बात' मधून आवाहन
- कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या सदस्यांची प्रोफाईल अपडेट करण्याची ऑनलाईन प्रक्रिया सुलभ
- बॉलीवुड अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ल्या प्रकरणी मुख्य संशयिताला ५ दिवसांची पोलीस कोठडी

**आणि**

- बीड जिल्ह्यातल्या घोडका राजुरी गावाजवळ एसटी बसची धडक लागून तीन युवकांचा मृत्यू, मृतांच्या कुटुंबांना दहा लाख रुपये अर्थसहाय्य देण्याची परिवहन मंत्र्यांची घोषणा

**<><><><><>**

संविधान सभेत झालेल्या चर्चा, सदस्यांनी मांडलेले विचार, हा आपला सर्वात मोठा वारसा असून संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा, असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहिलं पाहिजे, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज 'मन की बात' कार्यक्रमातून केलं.

भारताच्या प्रजासत्ताकाचा ७५ वा वर्धापन दिन, तसंच भारतीय संविधान लागू झाल्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्यानिमीत्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी संविधान सभेत मांडलेल्या विचारांचं ध्वनिमुद्रण प्रधानमंत्र्यांनी श्रोत्यांना ऐकवलं. येत्या २५ जानेवारीला राष्ट्रीय मतदार दिन असल्याचं सांगून ते म्हणाले की, संविधानाने निवडणूक आयोगाला खूप

महत्त्वाचं स्थान दिलं आहे, आणि गेल्या दशकभरात देशाची लोकशाही अधिक मजबूत आणि समृद्ध झाली आहे. निवडणूक आयोगानं तंत्रज्ञानाचा वापर करत, लोकशाहीला बळ दिलं आहे, असं म्हणत नागरिकांनी वेळोवेळी आपला मताधिकार बजावत लोकशाही प्रक्रियेचा भाग व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं.

भारतानं अंतराळ क्षेत्रात केलेल्या ऐतिहासिक कामगिरीविषयी त्यांनी श्रोत्यांना महिती दिली. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं अंतराळात दोन उपग्रहांना परस्परांशी जोडण्याचा प्रयोग नुकताच यशस्वी करून दाखवल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. भारतीय अंतराळ तंत्रज्ञान स्टार्ट-अप कंपनीनं देशातला पहिला खाजगी उपग्रह यशस्वीरित्या प्रक्षेपित केल्याची माहिती त्यांनी दिली.

ते म्हणाले.......

**होल्ड - बाईट - मन की बात**

काही दिवसांपूर्वीच स्टार्टअप इंडिया योजनेला ९ वर्ष पूर्ण झाल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी करून दिलं. या काळात देशात निर्माण झालेले अर्ध्यापेक्षा जास्त स्टार्टअप्स टियर २ आणि टियर ३ शहरांमधले आहेत,असं सांगून ते म्हणाले, यातून आपली स्टार्टअप संस्कृती केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित राहिलेली नाही हेच दिसून येतं. याबाबात त्यांनी वाशीमसह देशातल्या इतर काही शहरांचं उदाहरण दिलं. छोट्या शहरांमधले अर्ध्यापेक्षा जास्त स्टार्टअप्स मुली चालवतात, असंही त्यांनी कौतुकानं सांगितलं.

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरू असलेला महाकुंभमेळा म्हणजे एकतेचं दर्शन घडवणारा महाकुंभ आहे, असं ते म्हणाले. यंदाच्या कुंभमेळ्यात युवा वर्गाचा मोठा सहभाग असल्याचा उल्लेख करुन त्यांनी समाधान व्यक्त केलं. देशाच्या

विविध भागातले उत्सव- परंपरा आणि कुंभमेळा यांचा संबंध त्यांनी स्पष्ट केला. हा कुंभमेळा डिजीटल माध्यमांतून जागतिक स्तरावर लोकप्रिय ठरत असून त्याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे, असं ते म्हणाले. येत्या २३ जानेवारीला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीदिनी आपण पराक्रम दिवस साजरा करणार असल्याची आठवण त्यांनी श्रोत्यांना करुन दिली. सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याला उजाळा देतानाच बोस यांच्या घराला भेट दिल्याचा अनुभव त्यांनी श्रोत्यांना ऐकवला. देशात वन्यजीवांच्या संवर्धन आणि सहकार्यासाठी होत असलेल्या, तसंच महिला बचत गटांच्या प्रेरणादायी यशोगाथाही प्रधानंत्र्यांनी आजच्या 'मन की बात' मधून श्रोत्यांना ऐकवल्या.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व पालकमंत्र्यांची नावं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल जाहीर केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वतःकडे गडचिरोली जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी ठेवली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ठाणे आणि मुंबई शहर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे पुणे आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम पाहतील.

मुंबई उपनगरच्या पालकमंत्रीपदी आशीष शेलार यांची नियुक्ती करण्यात आली असून चंद्रशेखर बावनकुळे यांना नागपूर आणि अमरावतीचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी दिली आहे.

राधाकृष्ण विखे पाटील यांना अहिल्यानगर, चंद्रकांत पाटील यांना सांगली, गणेश नाईक - पालघर, गिरीश महाजन - नाशिक, उदय सामंत - रत्नागिरी, पंकजा मुंडे - जालना, अदिती तटकरे - रायगड, पंकज भोयर - वर्धा, संजय शिरसाट यांना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्त केलं आहे.

सह पालकमंत्री हे पद पहिल्यांदाच निर्माण करण्यात आलं असून गडचिरोलीचे पालकमंत्री म्हणून आशीष जयस्वाल आणि मुंबई उपनगरचे पालकमंत्री म्हणून मंगलप्रभात लोढा काम पाहतील.

<><><><><>

महाराष्ट्राचा विकास हेच आपलं ध्येय असून त्यापासून तसूभरही मागं हटायचं नाही, असं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे. शिर्डी इथं पक्षाच्या नवसंकल्प शिबिराच्या समारोप सत्रात ते बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस हा सर्व धर्मांचा आदर करणारा आहे, हे कृतीतून दिसावं, हा पक्ष नेत्यांपेक्षा कार्यकर्त्यांचा आहे, हे ठसवण्यासाठी काम करा, असा सल्लाही पवार यांनी कार्यकर्त्यांना दिला.

<><><><><>

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेनं सदस्यांची प्रोफाईल अपडेट करण्याची ऑनलाईन प्रक्रिया सुलभ केली आहे. ज्या सदस्यांचे युनिव्हर्सल अकाऊंट नंबर आधारकार्डच्या माध्यमातून वैध झाले आहेत, असे सदस्य त्यांच्या प्राेफाईलमध्ये त्यांचं स्वतःचं नाव, जन्मतारीख, लिंग, राष्ट्रीयत्व, वडिल अथवा आईचं नाव, रुजू झाल्याचा दिनांक, समाप्ती दिनांक आदी तपशील कुठल्याही कागदपत्रांशिवाय अपलोड करू शकतात.

या सुविधेचा लाभ ३ लाख ९० हजार कर्मचारी भविष्य निर्वाह निधी धारकांना होणार असल्याची माहिती श्रम आणि रोजगार मंत्रालयानं दिली आहे.

<><><><><>

बॉलीवुड अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला प्रकरणी मुख्य संशयिताला मुंबई पोलिसांनी ठाण्यातून अटक केली असून त्याला न्यायालयानं ५ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. त्याचं नाव मोहम्मद शरीफ इस्लाम शहजाद

असं असून तो मूळचा बांग्लादेशी असल्याचा संशय आहे. त्याने आधी आपलं नाव विजय दास असं सांगितलं होतं, पण पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर त्याचं खरं नाव समोर आलं. प्राथमिक पुरावे आणि त्याच्याकडे आढळलेल्या काही गोष्टींवरून तो बांग्लादेशचा नागरिक असल्याची शक्यता दिसत असल्याची माहिती मुंबई गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त दीक्षित गेडाम यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. हा संशयित चोरीच्या उद्देशानं सैफ अली खानच्या घरात घुसल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या घोडका राजुरी गावाजवळ आज सकाळी एसटी बसची धडक लागून तीन युवकांचा मृत्यू झाला. पोलिस भरतीसाठी धावण्याचा सराव करणाऱ्या या तिघांना बीडहून परभणीकडे जाणाऱ्या बसची धडक बसली. त्यात दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर एक जणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. हे तिघेही घोडका राजुरीचे रहिवासी होते. अपघातानंतर संतप्त जमावानं बस पेटवून दिली. पोलिसांनी बसचालकाला अटक केली आहे. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपयांचं अर्थसहाय्य परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

मुंबई पुणे एक्सप्रेसवे वर तळेगाव टोल प्लाझा जवळ आज एका एसटी बसला अचानक आग लागली. अग्निशमन दलाच्या पथकानं आग आटोक्यात आणली. आगीच्या कारणाचा तपास सुरु आहे.

मुंबई आग्रा महामार्गावर मालेगावहून नाशिकला जाणाऱ्या एका ट्रेलरच्या इंजिनाला आग लागली. चालकाने सावधगिरी दाखवून ट्रेलर इंजिनापासून वेगळा केला, मात्र इंजिन जळून खाक झालं.

नाशिक जिल्ह्यात सिन्नर इथं समृद्धी महामार्गावर एका टेम्पो ट्रॅव्हलरला आग लागल्याची घटना आज पहाटे घडली. अग्निशमन दलानं आगीवर नियंत्रण मिळवलं परंतु वाहन पूर्णपणे जळून गेलं.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यातल्या भिवंडी शहरात पोलिसांनी एका बांगलादेशी नागरिकाला अटक केली आहे. शांतिनगर पोलीस या बांगलादेशी नागरिकाची सखोल चौकशी करत आहेत. त्याच्याकडची सर्व कागदपत्रं बनावट असल्याचं आढळून आल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवैध वाळू वाहतूक विरोधात मोहीम उघडणारे कुडाळचे नायब तहसीलदार प्रतीक आढाव आणि त्यांच्याबरोबर असलेल्या कर्मचाऱ्यावर डंपर घालून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार कुडाळ पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे. ही घटना काल पहाटे सव्वा चार वाजण्याच्या सुमाराला पिंगुळी-गुढीपुर इथं घडली.

<><><><><>

डेन्मार्कच्या व्हिक्टर ॲक्सेलसेन यानं नवी दिल्लीत झालेल्या इंडियन ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीचं जेतेपद पटकावलं आहे. आज झालेल्या अंतिम सामन्यात त्यानं हाँगकाँगच्या सी यू ली याच्यावर २१-१६, २१-८ अशी थेट गेम्समध्ये मात केली. महिला एकेरीत दक्षिण कोरियाची ॲन से यंग अजिंक्य ठरली. तिनं थायलंडच्या पी. चोचुवाँगला २१-१२, २१-९ असं पराभूत केलं.

**<><><><><>**

मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली, तर कोकणात सरासरी किमान तापमानात किंचित वाढ झआली. येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील.